## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
## वृत्तस्तरीय निवड समिती, नागपूर वनवृत्त, नागपूर 2149

# शिपाई पदासाठी प्रश्नपत्रिका दिनांक 16/11/2014

एकूण प्रश्न -100 एकूण गुण - 200

एकूण वेळ - 2 तास (सकाळी 11.00 ते 1.00 वाजेपर्यंत)

**उमेदवारांसाठी सुचना**

**सुचना**
1 सर्व प्रश्न हे पर्यायी स्वरुपाचे असल्याने उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या सुचनेप्रमाणे उत्तरपत्रिका सोडविणे आवश्यक आहे.
2 एकापेक्षा जास्त उत्तरावर खुण केल्यास गुण मिळणार नाहीत. खाडाखोड केल्यास गुण मिळणार नाही.
3 प्रत्येक प्रश्नाच्या बरोबर उत्तरासाठी दोन गुण दिले जातील.
4 प्रवेशपत्रावर उमेदवाराने स्वाक्षरी करुन ते समवेक्षकाकडे सुपुर्द करावे.
5 उमेदवाराने कोणतीही कॅलक्युलेटर, संबंधीत वस्तु, पुस्तक, दस्ताऐवज, भ्रमणध्वनी (मोबाईल) इत्यादी परिक्षा खोलीच्या आत आणता कामा नये. पर्यवेक्षकांनी या बाबीची खात्री करावी.
6 परिक्षा केंद्रावर कोणताही गैरप्रकार केल्यास संबंधित उमेदवार कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील, याची नोंद घ्यावी.
7 परिक्षेची वेळ संपल्यावर उमेदवारांनी प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका समवेक्षकाच्या सुपुर्द केल्याशिवाय बाहेर जाऊ नये.

---

प्रश्न 1) 9506 - 7775 = ?

A) 1731 B) 1831 C) 1931 D) 1531

प्रश्न 2) वर्तुळाच्या सर्वात मोठ्या जीवेची लांबी 18 से.मी. आहे, तर पुढील पर्यायांपैकी बरोबर विधान कोणते ?

A) त्रिज्येची लांबी 9 से.मी. असेल B) व्यासाची लांबी 9 से.मी. असेल

C) त्रिज्येची लांबी 18 से.मी. असेल D) व्यासाची लांबी 36 से.मी. असेल

प्रश्न 3) सोबतच्या आकृतीतील चौरसांची संख्या किती ?

A) 4 B) 5 C) 8 D) 9



प्रश्न 4) घनाच्या बाजु व त्याचे शिरोबिंदू यातील फरक किती ?

A) 0 B) 3 C) 6 D) 4

प्रश्न 5) पुढील मांडणीने तयार होणारी संख्या अक्षरात लिहा :-

6 x 10 + 5 x 100 + 7 x 1 + 3 x 1000 + 2 x 10000

A) तीन हजार पाचशे सदुसष्ट B) तेविस हजार पाचशे सात

C) तेविस हजार पाचशे सदुसष्ट D) पस्तीस हजार सहाशे सात

प्रश्न 6) 666, 699, 686, 668 या संख्या उतारत्या क्रमाने लावल्यास त्यातील पहीली व तीसरी संख्या यांची बेरीज किती ?

A) 1358 B) 1385 C) 1367 D) 1376

प्रश्न 7) एक पुस्तक व एक वही यांची एकूण किंमत रुपये 36 आहे जर वहीची किंमत पुस्तकाच्या किंमती पेक्षा 8 रुपयांनी किमी असेल तर वहीची किंमत किती ?

A) रुपये 28 B) रुपये 14 C) रुपये 22 D) रुपये 8

प्रश्न 8) एका जंगलातील एकूण 97898 झाडांपैकी 9789 झाडे वादळाच्या तडाख्याने पडली तर किती झाडे टिकली ?

A) 81809 B) 88117 C) 8809 D) 88019

प्रश्न 9) पुनितकडे 675 फुले आहेत प्रत्येक हारात 15 फुले याप्रमाणे किती हार बनविता येतील ?
A) 45 B) 55 C) 35 D) 25

प्रश्न 10) 360 से.मी. लांबीची तार 8 ठिकाणी कापून तीचे समान तुकडे केले, तर प्रत्येक तुकड्याची लांबी किती ?
A) 45 से.मी. B) 40 से.मी. C) 36 से.मी. D) 48 से.मी.

प्रश्न 11) 1 कि.मी. लांबीच्या रस्त्यावर एकाकडेने काही झाडे लावली आहेत, जर दोन लगतच्या झाडांमधील अंतर 25 मिटर असेल तर एकूण किती झाडे लावली आहेत ?
A) 42 B) 41 C) 40 D) 39

प्रश्न 12) एका दुध केंद्रात गाईचे 805 लीटर व म्हशीचे 915 लीटर दुध जमा झाले. जर त्यातील 1575 लीटर दुध विकले गेले असेत तर त्या केंद्रात किती लिटर दुध शिल्लक राहीले ?
A) 155 B) 145 C) 1720 D) 255

प्रश्न 13) 2 तास 50 मिनीटे म्हणजे किती मिनीटे ?
A) 250 B) 150 C) 170 D) 2500

प्रश्न 14) पुढील पैकी कोणती तारीख बरोबर आहे ?
A) 31-9-08 B) 29-2-09 C) 31-7-08 D) 31-11-08

प्रश्न 15) एका चौरसाकृती बागेच्या बाजूची लांबी 200 मीटर आहे. पियुष या बागे भोवती रोज 5 फेऱ्या घालतो, तर तो रोज किती कि.मी. अंतर चालतो ?
A) 1 B) 2 C) 3 D) 4

प्रश्न 16) अमृताने 21 रेडीओ 11760 रुपयांना खरेदी केले. तर प्रत्येक रेडीओची किंमत किती ?
A) 660 B) 560 C) 460 D) 760

प्रश्न 17) 70 मुलांच्या एका वर्गात 28 मुले प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झालीत तर किती टक्के मुले प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झालीत ?
A) 15% B) 35% C) 40% D) 30 %

प्रश्न 18) दरसाल दर शेकडा 15 रुपये दराने 900 मुद्दलाचे 4 वर्षाचे व्याज किती ?
A) 540 B) 450 C) 530 D) 550

प्रश्न 19) एका आयताकृती मैदानाची लांबी वरुंदी अनुक्रमे 84 मीटर व 36 मीटर आहे. त्या मैदाना भोवती 10 फेऱ्या घातल्यास एकूण किती अंतर कापल्या जाईल ?
A) 2400 मीटर B) 1200 मीटर C) 600 मीटर D) 480 मीटर

प्रश्न 20) पुढील संख्या मालीकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?
1, 3, 7, 15, 31, ?
A) 33 B) 48 C) 63 D) 16

खालील कविता वाचुन त्याखालील प्रश्नांची उत्तरे शोध.

<u>**कविता**</u>

माझा हिंदूस्थान
हिमालयाचे हीरकमंडित शिरभूषण सरदार
वक्षावर गंगा यमुनांचे रुळती मौक्तीक हार
कटीस तळपे मराठ मोळ्या गोदीची तलवार
महोदधीचे चरणाजवळी गर्जत असे आव्हान
माझा हिंदूस्थान.

पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी
गळ्यामध्ये गरीबांच्या गाजे संतांची वाणी
ज्योतीसम समरात जळाली झाशीची राणी
त्या संताचे, त्या विरांचे प्रियतम तिर्थस्थान
माझा हिंदूस्थान.

प्रश्न 21) भारतीय वीर पुरुषांचे तिर्थस्थान कोणते ?
A) हिमालय पर्वत B) झाशीची राणी C) हिंदूस्थान D) शिवाजी महाराज

प्रश्न 22) समुद्र या अर्थाने कवितेत कोणता शब्द आला आहे ?
A) कटी B) महोदधी C) गंगा येमुना D) गोदावरी

प्रश्न 23) खालील वाक्यातील नाम ओळखा ?
आंबेहळद पिवळ्या रंगाची असते.
A) आंबे B) असते C) पिवळ्या D) आंबेहळद

प्रश्न 24) खालील पर्यायात नाम नसलेला पर्याय निवडा ?
A) गुलाबी B) रंग C) गुलाब D) गुलबकावली

प्रश्न 25) खालील वाक्यातील सर्वनाम ओळखा ?
अरे हरीष, आपण खेळूया का ?
A) अरे B) आपण C) का D) हरीष

प्रश्न 26) खालील वाक्यातील क्रियापद ओळखा ?
लहानपणी एडीसन मोठा खटपट्या होता.
A) एडीसन B) होता C) खटपट्या D) मोठा

प्रश्न 27) विरुध्द लिंगी शब्द निवडा ?
तरुण
A) तरणी B) तारणी C) तरुणी D) करुणी

प्रश्न 28) वेगळा लिंग असलेला शब्द ओळखा ?
A) दप्तर B) पेन्सील C) लेखनी D) दौत

प्रश्न 29) विरुध्दलिंगी शब्दाची बरोबर जोडी ओळखा ?
A) बालक-बाळी B) देव-देवी C) रेडा-गाय D) वर-खाली

प्रश्न 30) वाक्प्रचाराच्या योग्य अर्थाचा पर्याय निवडा ?
खडे चारणे.
A) पराभव करणे B) दुसऱ्याला दोष देणे
C) भांडण उकरुन काढणे D) कामात विघ्न आनणे

प्रश्न 31) वाक्प्रचाराच्या योग्य अर्थाचा पर्याय निवडा ?
टेंभा मिरवणे.
A) जिंकणे B) खोचक बोलणे C) ऐट दाखविणे D) शोध घेणे

प्रश्न 32) अधोरेखीत शब्दाचा ज्या अर्थाने वापर केला आहे तो शब्द निवडा ?
हाडाची <u>काडे</u> करणे.
A) कृश B) किंतू C) अतिकष्ट D) खाने

प्रश्न 33) समान अर्थ असलेली वाक्प्रचाराची जोडी कोणती ?

A) नवल वाटणे-तोंड देणे B) काणोसा घेणे-कान फुंकणे

C) कान निवणे-डोळे निवणे D) डोळे झाक करणे-कानामागे टाकणे

प्रश्न 34) शब्दाला समानार्थी नसलेल्या शब्दाचा पर्याय निवडा.

समुद्र-

A) जलधी B) जलद C) सिंधू D) रत्नाकर

प्रश्न 35) शब्दाला समानार्थी नसलेल्या शब्दाचा पर्याय निवडा.

शीर-

A) मस्तक B) माथा C) शृंग D) डोके

प्रश्न 36) शब्दाला समानार्थी असलेल्या शब्दाचा पर्याय निवडा.

उदक-

A) दुध B) पाणी C) अमृत D) उद्या

प्रश्न 37) विरुध्दार्थी शब्दाची चुकीची जोडी शोधा.

A) कर्कश x मंजूळ B) आशा x निराशा C) सुविचार x कुविचार D) पापी x प्रतापी

प्रश्न 38) शब्दाला विरुध्दार्थी असलेल्या शब्दाचा पर्याय निवडा.

वैयक्तिक-

A) नैमित्तीक B) सार्वजनिक C) व्यक्तीगत D) संयुक्तीक

प्रश्न 39) घोड्यांना बांधण्याची किल्ल्यातील जागा-----.

A) तबेला B) पागा C) गुहा D) खुराडे

प्रश्न 40) लेकी बोले सुने लागे या म्हणीचा योग्य अर्थ दर्शविणारा शब्द समुह निवडा.

A) एकाला उद्देशुन दुसऱ्याला लागेल असे बोलणे.

B) लेकीला बोलताच सुनेला लागणे.

C) लेकीने सुनेला लागेल असे बोलणे.

D) एकाला उद्देशुन बोलले, तर ते दुसऱ्याने गुपचूप ऐकणे.

प्रश्न 41) महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी सद्या कोण कार्यरत आहेत ?

A) श्री. पृथ्वीराज चव्हाण B) श्री. देवेंद्र फडणविस

C) श्री. शरद पवार D) श्री. अशोक चव्हाण

प्रश्न 42) राष्ट्रीय महामार्ग क्र.6 हा कोणत्या शहरातून जात नाही ?

A) नागपूर B) भंडारा C) अकोला D) चंद्रपूर

प्रश्न 43) छत्रपती शिवाजी महाराजांचे मातोश्रींचे माहेर कोणते ?

A) देऊळगांव राजा B) मेहकर C) वाशिम D) सिंदखेडराजा

प्रश्न 44) विदर्भातील कृषी विद्यापिठाचे मुख्यालय कोठे आहे ?

A) नागपूर B) परभणी C) अकोला D) अमरावती

प्रश्न 45) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अंतरराष्ट्रीय विमानतळ कोणत्या शहरात आहे ?

A) मुंबई B) कोलकत्ता C) नागपूर D) चेन्नई

प्रश्न 46) सुर्यमालेतील सर्वात शेवटचा व सूर्यापासून सर्वात लांबचा नववा ग्रह कोणता ?

A) नेपच्युन B) युरेनस C) मंगळ D) प्लुटो

प्रश्न 47) भारतातील चिलका सरोवर हे स्थळ कोणत्या राज्यात आहे ?
A) पश्चिम बंगाल B) कर्नाटक C) महाराष्ट्र D) ओरीसा

प्रश्न 48) क्रिकेटमध्ये एकदिवसीय सामन्यात सर्वात जास्त धावा काढणाऱ्या क्रिकेटरचे नांव काय आहे ?
A) सचिन तेंडूलकर B) विरेंद्र सेहवाग C) विवियन रिचर्डस् D) रोहीत शर्मा

प्रश्न 49) एकदिवसीय सामन्यात सर्वात वेगवान शतक कोणत्या देशाच्या क्रिकेटपटुने केले ?
A) भारत B) पाकीस्तान C) श्रीलंका D) वेस्टंडीज

प्रश्न 50) महाराष्ट्रात सर्वात पहीला साखर कारखाना कोणत्या जिल्ह्यात सुरु झाला ?
A) कोल्हापूर B) सातारा C) सांगली D) अहमदनगर

प्रश्न 51) खालील पैकी कोणत्या जिल्ह्यात हळदीचे उत्पन्न जास्त होते ?
A) पुणे B) सांगली C) नाशिक D) सोलापूर

प्रश्न 52) वर्धा-वेणा या नद्यांचे संगमस्थान कोणत्या जिल्ह्यात आहे ?
A) अमरावती B) बुलढाणा C) वर्धा D) अकोला

प्रश्न 53) जायकवाडी, अभयारण्य, भिमाशंकर या तिन्ही शब्दात एकच समान बाब आहे, ती कोणती ?
A) सगळ्या शब्दात 'य' हे अक्षर आहे. B) तिन्ही धरणे आहेत.
C) तिन्ही देवळे आहेत. D) प्रत्येक शब्द पाच अक्षरी आहे.

प्रश्न 54) सैह्यांद्री पर्वतातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर कोणते ?
A) कळसुबाई B) साल्हेर C) महाबळेश्वर D) हरीशचंद्रगड

प्रश्न 55) अंबाघाट हा कोणत्या दोन जिल्ह्यांना जोडतो ?
A) कोल्हापूर-रत्नागिरी B) कोल्हापूर-पणजी C) सातारा-अलीबाग D) सातारा-रत्नागिरी

प्रश्न 56) गटात न बसणाऱ्या शब्दाचा पर्याय निवडा ?
A) नदी B) तलाव C) डबके D) विहीर

प्रश्न 57) गटात न बसणाऱ्या शब्दाचा पर्याय निवडा ?
A) एव्हरेस्ट B) सैह्यांद्री C) विंध्याद्री D) निलगीरी

प्रश्न 58) महाराष्ट्रात कृत्रीम पावसाचा प्रयोग सर्वप्रथम कोणत्या जिल्ह्यात करण्यात आला ?
A) सांगली B) सातारा C) अहमदनगर D) कोल्हापूर

प्रश्न 59) माजी मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांचे नांव कोणत्या अभयारण्याला देण्यात आले ?
A) सागरेश्वर B) कोयना C) चांदोली D) तानसा

प्रश्न 60) संगीता पेक्षा तारका मोठी आहे, पण किरण तारका पेक्षा लहान आहे तर सर्वात मोठे कोण ?
A) संगीता B) तारका C) किरण D) कोणीच नाही

प्रश्न 61) महाराष्ट्राच्या निसर्ग मानचिन्हात कोणत्या फुलाचा अंतर्भाव केला आहे ?
A) कमळ B) गुलाब C) जारुळ-तामण D) मोगरा

प्रश्न 62) खालीलपैकी कोणती नदी अरबी समुद्राला जावून मिळते ?
A) कृष्णा B) कोयना C) गोदावरी D) तापी

प्रश्न 63) दारणा नदीवरील धरण कोणत्या जिल्ह्यात बांधले आहे ?
A) नाशिक B) जळगांव C) अहमदनगर D) धुळे

प्रश्न 64) पाचजणांच्या धावण्याच्या शर्यतीत हत्तीच्या मागे वाघ पळत होता. सस्याच्या पुढे घोडा पळत होता. हत्ती आणि ससा यांच्यामध्ये उंट पळत होता, तर सर्वात शेवटी कोण पळत होता ?

A) वाघ B) हत्ती C) ससा D) घोडा

प्रश्न 65) महाराष्ट्रातील तलावांचा जिल्हा म्हणून कोणत्या जिल्ह्याची ओळख आहे ?

A) भंडारा B) नागपूर C) गडचिरोली D) अमरावती

प्रश्न 66) जर गणिताला भाषा, भूगोलाला गणित, भाषेला विज्ञान व विज्ञानाला इतिहास म्हटले तर पाढ्यांचा समावेश कोणत्या विषयात असेल ?

A) गणित B) भूगोल C) भाषा D) विज्ञान

प्रश्न 67) राष्ट्रीय लिंबूवर्गीय फळे संशोधन केंद्र कोठे आहे ?

A) नागपूर B) जळगांव C) रायगड D) ठाणे

प्रश्न 68) पुढील पैकी कोणती वेळ चुकीची दाखविली आहे ?

A) 2:20 B) 8:51 C) 9:13 D) 12:61

प्रश्न 69) गोड्या पाण्यातील मासे निर्मितीत महाराष्ट्राचा भारतात कितवा क्रमांक आहे ?

A) प्रथम B) दुसरा C) पाचवा D) सातवा

प्रश्न 70) महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय बंदर कोणते ?

A) रत्नागिरी B) न्हावाशेवा C) मालवन D) देवगड

प्रश्न 71) जर तुम्ही सकाळी लवकर उत्तर दिशेला फिरावयास गेलात तर सुर्य तुमच्या कोणत्या बाजूला असेल ?

A) डाव्या बाजूला B) पाठीमागे C) उजव्या बाजूला D) समोर

प्रश्न 72) नळदुर्ग हा भुयकोट किल्ला महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात आहे ?

A) उस्मानाबाद B) औरंगाबाद C) जालना D) परभणी

प्रश्न 73) पुरंदरच्या लढाई छत्रपती शिवाजी महाराजांनी विजापूरच्या कोणत्या सरदाराचा पराभव केला ?

A) आलमखान B) फत्तेखान C) नुरखान D) सिद्दीजोहर

प्रश्न 74) छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यु रायगडावर केव्हा झाला ?

A) 1680 B) 1679 C) 1681 D) 1678

प्रश्न 75) व्यायामाच्या तासाच्या वेळी खेळतांना तुमच्या मित्राला किरकोळ दुखापत झाली तर काय करावे ?

A) सगळ्या वर्ग मित्रांना बोलावून आणावे.

B) शाळेच्या जवळपास हॉस्पिटल असल्यास तेथे न्यावे.

C) शाळेच्या प्रथमोपचाराच्या पेटीतील औषध लावावे.

D) मित्राला दुखापत कशामुळे झाली याची चर्चा करावी.

प्रश्न 76) शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील पत्र व्यवहार पाहणारे सचिव कोण होते ?

A) अण्णाजी दत्तो B) रामचंद्र त्र्यंबक C) निराजी रावजी D) रघुनाथ पंडीतराव

प्रश्न 77) पाणीपतची तिसरी लढाई कोणत्या वर्षी झाली ?

A) 1760 B) 1759 C) 1761 D) 1762

प्रश्न 78) शाळेची सहल प्रतापगडावर गेली होती. त्यावेळची कोणती कृती योग्य ठरवा ?

A) गडाच्या भिंतीवर स्वतःचे नांव लिहणे. B) पक्षांना खडे मारणे.

C) गडाचे निरिक्षण करुन नोंदी घेणे. D) झाडांची पाने तोडणे.

प्रश्न 79) 'स्वाईनफ्लु' या संसर्गजन्य रोगाच्या साथीत पुढील पैकी कोणती कृती योग्य ठरेल ?

A) तोंडावर रुमाल न धरता जोराने शिंकणे.
B) तोंडावर स्वच्छ धुतलेला रुमाल बांधणे.
C) गर्दीच्या ठिकाणी फिरायला जाणे.
D) चित्रपट पाहण्यासाठी सिनेमागृहात जाणे.

प्रश्न 80) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे कोणत्या राज्यात आहे ?

A) गुजरात B) महाराष्ट्र C) कर्नाटक D) उत्तर प्रदेश

प्रश्न 81) महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने पाऊस कोणत्या वाऱ्यांपासून पडतो ?

A) नैऋत्य मान्सून वारे B) ईशान्य मान्सून वारे C) उत्तरेकडील वारे D) दक्षिणेकडील वारे

प्रश्न 82) त्रिस्तरीय पंचायतराज संस्था महाराष्ट्रात किधीपासून अस्तित्वात आली ?

A) 1962 B) 1961 C) 1963 D) 1960

प्रश्न 83) 'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राचे संस्थापक खालीलपैकी कोण आहेत ?

A) बाळशास्त्री जांभेकर B) गोपाळहरी देशमुख C) डॉ. भाऊदाजी लाड D) विष्णूबुवा ब्रम्हचारी

प्रश्न 84) 'स्त्री -पुरुष तुलना' हा निबंध महाराष्ट्रातील कोणत्या समाजसुधारकानी लिहला ?

A) ताराबाई शिंदे B) पंडीता रमाबाई C) रमाबाई रानडे D) सावित्रीबाई फुले

प्रश्न 85) 'डिप्रेस्ड क्लास मिशन' या संस्थेची स्थापना खालील कोणत्या समाज सुधारकानी केली ?

A) विष्णूशास्त्री चिपळूणकर
B) महर्षि विठ्ठल रामजी शिंदे
C) नारायण लोखंडे
D) छत्रपती शाहू महाराज

प्रश्न 86) 'अखिल भारतीय मागास जाती संघ' कोणत्या समाज सुधारकानी स्थापन केला ?

A) डॉ. पंजाबराव देशमुख
B) केशवराव जेधे
C) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
D) ताराबाई मोडक

प्रश्न 87) 'प्रबुध्द भारत' या नियतकालीकाचे संपादक कोण होते ?

A) कर्मविर दादासाहेब गायवाड
B) कर्मविर भाऊराव पाटील
C) हमीद दलवाई
D) डॉ. बाबा आढाव

प्रश्न 88) 'सर्च' या सेवाभावी संस्थेची स्थापना कोणी केली ?

A) डॉ. अभय व राणी बंग
B) डॉ. प्रकाश आमटे
C) डॉ. अनिल अवचट
D) रघुनाथ कर्वे

प्रश्न 89) खालीलपैकी कोणत्या आधुनिक संताचा जन्म अमरावती जिल्ह्यात झाला नाही ?

A) श्री. गाडगे महाराज B) श्री. गुलाब महाराज C) श्री. तुकडोजी महाराज D) श्री. विनोबा भावे

प्रश्न 90) देशातील पहिली सहकारी सुतगिरणी महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यात सुरु झाली ?

A) सातारा B) कोल्हापूर C) सांगली D) पुणे

प्रश्न 91) महाराष्ट्र विधीमंडळातील विधानसभा अध्यक्षाला शपथ कोण देतो ?

A) मुख्यमंत्री B) राज्यपाल C) राष्ट्रपती D) मुख्य न्यायाधिश

प्रश्न 92) खालील पैकी कोठे महाराष्ट्राच्या उच्च न्यायालयाचे खंडपीठ नाही ?

A) मुंबई B) नागपूर C) औरंगाबाद D) कोल्हापूर

प्रश्न 93) ग्रामसभेचे सदस्य कोण असतात ?

A) गावातील सर्व प्रौढ नागरिक
B) सर्व ग्रामस्थ
C) गावातील लहान मुले
D) गावातील महिला

प्रश्न 94) कवी 'बी' यांचे पुर्ण नांव कोणते ?

A) नारायण वामन टिळक | B) नारायण मुरलीधर गुप्ते
C) ना.धो. महानोर | D) ना.घ. देशपांडे

प्रश्न 95) 'माझा रशियाचा प्रवास' हे प्रवास वर्णन कोणी लिहले ?

A) अण्णाभाऊ साठे B) अनिल अवचट C) गंगाधर गाडगीळ D) मंगला राजवाडे

प्रश्न 96) लाळेतील ----- मुळे पिष्टमय पदार्थाचे रुपांतर साखरेत होते.

A) स्वादुरस B) टायलीन C) आंत्ररस D) पित्तरस

प्रश्न 97) रातआंधळेपणा हा विकार कोणत्या जीवनसत्वा अभावी होतो ?

A) ब-जीवनसत्व B) क-जीवनसत्व C) ड-जीवनसत्व D) अ-जीवनसत्व

प्रश्न 98) वनस्पितीतील शाखीय प्रजननाची कृत्रिम पध्दती कोणती ?

A) कलिकायन B) कलम C) फलन D) खंडीभवन

प्रश्न 99) पक्षांना नाकाऐवजी श्वास घेण्यासाठी काय असते ?

A) छिद्र B) कल्ले C) पिसे D) त्वचा

प्रश्न 100) अशुध्द रक्तात कोणता वायु कमी झालेला असतो ?

A) ऑक्सीजन B) कार्बनडाय ऑक्साईड C) नायट्रोजन D) सल्फरडाय ऑक्साईड

------------------------0000------------------------

*दिनांक 15/11/2014, वेळ : 19.00 वाजता*

*नागपूरवनवृत्त -*